दिनांक: २४.०४.२०२५

नियमीत फौ. प्र. क्र.८२८/२०२०
सरकार ...वि... बाबुराव व इतर
**निशाणी क्र.६०**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ ची साक्ष शपथेवर सुरु....**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | **मोहन रुपरावजी चौखट** |
| वय | – | ५७ वर्षे, धंदा – पोलीस उपनिरीक्षक, |
| राहणार | – | पोलीस स्टेशन नांदगाव पेठ, अमरावती. |

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री. एस. एन. वानखडे यांच्यामार्फत**

१. दिनांक ०४.०८.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन नांदगांव पेठ अमरावती येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो व डयुटीवर हजर होतो. सदर दिवशी माझ्याकडे भा.दं.विचे कलम ३२४, २९४, ३४ अंतर्गत गुन्हा क्र.२४५/२०१९ नोंद झालेल्या प्रकरणाची तपास दैनंदिनी पुढील तपासाकरीता प्राप्त झाली. मला तपास दैनंदिनीसोबत तोंडी रिपोर्ट, प्रथम सुचना रिपोर्ट तसेच घटनास्थळ पंचनामा प्राप्त झाले होते. प्रकरणाची तपास दैनंदिनी प्राप्त झाल्यानंतर मी दिनांक ०८.०८.२०१९ रोजी तिनही आरोपींना अटक केली. त्यानंतर मी आरोपी बाबाराव बुरघाटे याने माझ्यासमक्ष हजर केलेली गुनहयात वापरलेली काठी दोन पंच नामे अशोक तानाजी वानखडे व सचीन कैलास साबळे यांच्यासमक्ष जप्ती पंचनामा तयार करुन जप्त केली. काठीचा जप्ती पंचनामा आता मला दाखविला असता त्यावरील माझी तसेच दोघा पंचांची सही तसेच आरोपी बाबाराव बुरघाटे याची सही मी ओळखतो. जप्ती पंचनाम्यातील मजकुर बरोबर असुन जप्ती पंचनामा **नि.क्र.६१** वर आहे. त्यानंतर मी आरोपींना समजपत्र देवुन मुक्त केले. दिनांक ०९.०८.२०१९ रोजी मी घटनास्थळावर जावुन फिर्यादी तसेच इतर साक्षीदारांचे बयाणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. दिनांक १२.०८.२०१९ रोजी मी फिर्यादी शंकरराव बुरघाटे याचे पुरवणी बयाण नोंदविले.त्यानंतर मी प्रकरणाचा तपास पुर्ण करुन आरोपी क्र.१ ते ३ च्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी क्र.१ ते ३ आज न्यायालयात उपस्थीत असुन मी त्यांना ओळखतो. आता मला मी तपासादरम्यान आरोपी बाबाराव बुरघाटे याच्याकडुन जप्त केलेली मुद्देमाल क्र.२२२/२०२३ वरील काठी

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030045032020-orderno-1.pdf
www.ecourtsindia.com

दाखविली असता ती मी ओळखतो. सदरची काठी मी तपासादरम्यान आरोपी बाबाराव बुरघाटे याच्या ताब्यातुन दोघा पंचासमक्ष जप्त केल्यामुळे ती मी ओळखतो. ती **आर्टीकल अ** वर आहे.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास ॲड. श्री.एस. एस. थोरात यांचे मार्फत–</u>**

२. हे म्हणने खरे आहे की, कुठल्याही जप्त वस्तुला सिल करण्यापुर्वी जप्त वस्तुबाबतचा जप्ती पंचनामा तयार करावा लागतो. हे म्हणने खरे आहे की, जप्ती पंचनामा नि.क्र.६१ मध्ये मी काठी आरोपी बाबाराव बुरघाटे याने आणुन हजर केल्याचे नमुद केले नाही. हे म्हणने खरे आहे की, कुठलीही वस्तु जप्त करण्याच्याबाबतच्या प्रक्रियेमध्ये ती वस्तु जप्त केल्याबाबत जप्ती पंचनामा करुन जप्त केलेल्या वस्तुवर जप्त केलेल्या व्यक्ती, जप्त करणाऱ्या व्यक्ती व पंचांच्या सहीचे लेबल लावणे गरजेचे असते. हे म्हणने खरे नाही की, मी जप्ती पंचनामा नि.क्र.६१ मध्ये काठी आरोपी बाबाराव बुरघाटे ताब्यातुन दोघा पंचांसमक्ष जप्त करुन त्यावर सर्वांच्या सहीचे लेबल लावल्याची बाब लिहीलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच्या जखमेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, फिर्यादी हा वैद्यकीय तपासणीकरीता रुग्णालयात गेला नव्हता. मी तपासादरम्यान फिर्यादी शंकरराव बुरघाटे यांचे बयाण नोंदविले होते. फिर्यादी शंकरराव याने मला बयाण देताना असे सांगीतले नव्हते की, "घटनेच्या वेळेस आरोपी बाबारावच्या पत्नीने त्याच्या पत्नीला मारहाण केली होती ”. फिर्यादी शंकरराव याने मला बयाण देताना असे सांगीतले नव्हते की, “त्याची पत्नी रुग्णालयात दहा दिवस भर्ती होती". मी साक्षीदार संध्या शंकरराव बुरघाटे हिचे बयाण तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. साक्षीदार संध्या बुरघाटे हिने मला बयाण देताना असे सांगीतले नव्हते की, "आरोपी उज्वला हिने तिला मारहाण केली होती". साक्षीदार संध्या बुरघाटे हिने मला बयाण देताना असे सांगीतले होते की, "तिच्या घरासमोर आरोपी बाबाराव देविदास बुरघाटे हे नेहमी तिच्या घरासमोर बैलबंडी लावतात याच कारणाने त्यांचे व तिचे पटत नाही व त्यामुळे ते आपसात बोलत नाहीत". मी सा.क्र.३ अक्षदा शंकरराव बुरघाटे हिचे बयाण तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. साक्षीदार अक्षदा बुरघाटे हिने मला बयाण देताना असे सांगीतले नव्हते की, "घटनेच्या वेळेस आरोपी क्र.१ बाबाराव यांनी त्याच्या घरातील आणलेल्या काठीने तिच्या

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030045032020-orderno-1.pdf

www.ecourtsindia.com

वडीलांच्या पाठीवर मारले होते". हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या सांगण्यावरुन चुकीचा तपास करुन साक्षीदारांचे बयाण त्यांचया सांगण्याप्रमाणे न नोंदवुन आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज न्यायालयात आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

( पी.के.नरडेले )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.१, अमरावती.
दि. २४.०४.२०२५.

समक्ष

( पी.के. नरडेले )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.१, अमरावती.
दिनांक: २४.०४.२०२५

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030045032020-orderno-1.pdf

www.ecourtsindia.com

दिनांक: २४.०४.२०२५

नियमीत फौ. प्र. क्र.८२८/२०२०
सरकार ...वि... बाबुराव व इतर
**निशाणी क्र.५८**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची साक्ष शपथेवर सुरु....**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | **प्रणय लक्ष्मणराव वाघमारे** |
| वय | – | ५४ वर्षे, धंदा – सहा. पोलीस उपनिरीक्षक, ब.नं.९४२ |
| राहणार | – | पोलीस मुख्यालय अमरावती. |

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री. एस. एन. वानखडे यांच्यामार्फत**

१. दिनांक ०४.०८.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन नांदगांव पेठ अमरावती येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो व डयुटीवर हजर होतो. दिनांक ०४.०८.२०१९ रोजी पोलीस उपनिरीक्षक बन्सोड यांनी आरोपींविरुध्द भा.दं.विचे कलम ३२४, २९४, ३४ अंतर्गत गुन्हा क्र.२४५/२०१९ नोंद करुन प्रकरणाचा प्राथमीक तपास माझ्याकडे सुपुर्द केला. प्रकरणाचा प्राथमीक तपास प्राप्त झाल्यानंतर मी दोन पंच नामे अमोल पंजाबराव हिवसे व चक्रधर किसनराव गवळी या दोघा पंचांना सोबत घेवुन रोहनखेडा या गावी असलेल्या फिर्यादीच्या घरासमोरील घटनास्थळावर घटनास्थळ पंचनामा तयार करण्याकरीता गेलो. घटनास्थळ मला फिर्यादीने दाखविले होते व त्याने दाखविलेल्या घटनास्थळाचा मी वरील नमुद दोघा पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. घटनास्थळ पंचनामा आता मला दाखविला असता त्यावरील माझी तसेच दोघा पंचांची सही मी ओळखतो. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर बरोबर असुन घटनास्थळ पंचनामा **नि.क्र.५९** वर आहे. त्यानंतर मी प्रकरणाचा पुढील तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक मोहन चौखट यांचेकडुन सुपुर्द केला होता.

**आरोपींतर्फे उलटतपास ॲड. श्री.एस. एस. थोरात यांचे मार्फत–**

२. मी फिर्यादी तसेच आरोपी यांच्या घराजवळ कोण कोण लोक राहतात याची चौकशी प्राथमीक तपासादरम्यान केली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, मी घटनास्थळ पंचनामा नि.क्र.५९ मध्ये घटनास्थळ मला आचल शंकरराव बुरघाटे हिने दाखविल्याचे नमुद केले आहे. हे म्हणने खरे आहे की, घटनास्थळ मला फिर्यादीने दाखविले नव्हते व आचल

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030045032020-orderno-1.pdf

शंकरराव बुरघाटे हिने दाखविले होते. हे म्हणने खरे नाही की, पंच चक्रधर गवळी याने न्यायालयात, मी घटनास्थळावर जावुन शहानिशा केली नव्हती असे सांगीतलेली बाब बरोबर आहे. हे म्हणने खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर पंच चक्रधर गवळी यास वाचुन दाखविला नव्हता. हे म्हणने खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी पंचांसमक्ष तयार केला नव्हता व त्यांचया फक्त सहया घेतल्या होत्या. हे म्हणने खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा नि.क्र.५९ पोलीस स्टेशन नांदगाव पेठ येथे बसुन तयार केला व त्याठिकाणी त्यावर पंचांच्या सहया घेतल्या होत्या. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या सांगण्यावरुन चुकीचा घटनास्थळ पंचनामा तयार करुन आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

( पी.के.नरडेले )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.१, अमरावती.
दि. २४.०४.२०२५.

समक्ष

( पी.के. नरडेले )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.१, अमरावती.
दिनांक: २४.०४.२०२५

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030045032020-orderno-1.pdf

www.ecourtsindia.com